# जनतेच्या संविधान अधिकारांचे संरक्षण करा !

जनतेच्या संवैधानिक अधिकारांवर आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपकडून मोठ्या प्रमाणात हल्ले होत आहेत म्हणून डाव्या पक्षाच्या वतीने संवैधानिक अधिकारांच्या संरक्षणसाठी २३ ते २५ फेब्रुवारी २०१६ दरम्यान देशभर मोहीम राबवण्यात येत आहे. मतभेत व्यक्त करणाऱ्यांना संपवून टाकणे, त्यांचा आवाज दाबून टाकणे हा मोदींचा पाठिंबा असलेल्या आर. एस.एस.चा अजेंडा आहे. सांप्रदायिक अजेंड्यांना आव्हान देणाऱ्या सर्वांना विशेषत: डाव्या पक्षांना लक्ष्य केले जात आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या द्वेषपूर्ण प्रचाराला, मुद्यांना डावे पक्ष कडाडून विरोध करतात, कोणतीही तडजोड न करता संघर्ष करतात हे पक्के माहीत असल्यामुळेच डाव्या पक्षांवर राष्ट्रविरोधी असल्याचा आरोप जाणीवपूर्वक लावला जातोय. तत्त्वज्ञान, इतिहास, विज्ञानाच्या क्षेत्रात उच्च जातीच्या जातीय दृष्टिकोनास, विचारास व प्रचारास प्रगतिशील व डाव्या पक्षांनी कडाडून विरोध केलेला आहे. संवाद, चर्चेच्या माध्यमाने जनतेची मने जिंकण्याची व आपले मुद्दे पटवून देण्याची सक्षमता आर. एस. एस. व भाजपमध्ये नसल्यामुळे तथ्य व तर्काच्या आधारावर विरोध करणाऱ्यांशी ते गैरवर्तन करीत आहेत, निंदानालस्ती व शिवीगाळही करीत आहेत.

आर. एस. एस.कडून देशभक्तीच्या प्रमाणपत्राची डाव्यांना  आवश्यकता नाही. जेव्हा सुटकेसाठी अंदमानच्या तुरुंगात राहून दयेची याचना सावरकर करीत होते तेव्हा गणेश घोष, शिव वर्मा, सुबोध राय सारख्या असंख्य कम्युनिस्ट कैद्यांनी व स्वातंत्र्यसैनिकांनी इंग्रजांपुढे शरणागती पत्करण्यास नकार दिला होता व अंदमानच्या तुरुंगातच राहण्याचा बाणा दाखवला होता. आपल्या देशाचा नायक असलेल्या व स्वत:ला कम्युनिस्ट म्हणवून घेणाऱ्या भगतसिंगाने इन्कलाब जिंदाबादचा नारा देत फाशीचा स्तंभ जवळ केला होता. आर एस. एस.ने स्वातंत्र्य आंदोलनात भागीदारी केलेली नव्हती, जनतेमध्ये भीती निर्माण  करण्यात आर. एस. एस.चे नेते पुढे होते. त्याचा उत्तम पुरावा म्हणजे सरसंघचालक गोळवलकर गुरुजींचे विधान. गोळवलकरांनी महात्मा गांधींच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादास विरोध केला होता.

''हिंदू वंशाचे गौरविकरण करून हिंदू वंश व हिंदू राष्ट्राचे स्थान ज्यांच्या हृदयाच्या इतके आहे व ते 'लक्ष्य' पूर्ण करण्यासाठी जे धडपडतात तेच खरे राष्ट्रभक्त आहेत. इतर सर्वजण देशद्रोही, विश्वासघातकी व शत्रू आहेत.''

तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डॉ. शंकर दयाल शर्मा यांनी स्वातंत्र्य आंदोलनातील कम्युनिस्ट पक्षाच्या सहभागाची नोंद घेतली होती. संसदेत ते म्हणाले होते, 'कानपूर, जमशेदपूर, अहमदाबाद आदी ठिकाणच्या कापड गिरण्यांतील प्रदीर्घ संपानंतर लंडनमधील सेक्रेटरींना ५ सप्टेंबर १९४२ रोजी जो खलिता पाठवण्यात आला होता त्यामध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा उल्लेख करण्यात आला होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या बहुतांश सभासदांचे वागणे व कृती ही इंग्रजांच्या विरोधात आहे, असे या खलित्यात स्पष्ट करण्यात आले होते. कम्युनिस्टांबद्दल इंग्रज वसाहतवाद्यांचे हे मत होते.' कम्युनिस्टांना त्यांचे एजंट म्हणणे हे त्यामुळेच चुकीचे आहे.'' विद्यापीठे ताब्यात घेऊन आर. एस. एस.च्या शाखांप्रमाणे ती चालवीत असे भाजपला वाटते आहे. अनेक अपात्र व्यक्तींची, समर्थकांची अनेक विद्यापीठांत  पेरणी करूनही समाधानी नसलेल्या भाजप, आर. एस. एस.ला आता विद्यापीठांची स्वायत्तता संपवायची आहे. देशभरातील विद्यापीठांवर या कारणामुळेच हल्ले होताहेत. केवळ भाजपचे समर्थक असल्याने एफ. टी. आय. आय. वर झालेली अपात्र व्यक्तीची नेमणूक असो की पेरियार आंबेडकर सोसायटी ज्या आय. आय.टीमध्ये विद्यार्थी चालवतात त्या चेन्नईच्या संस्थेस राष्ट्रद्रोही ठरवणे असो, हैदराबाद विद्यापीठातील दलित विद्यार्थ्यांना वसतिगृहाबाहेर हाकलणे व रोहित वेमूलाचा प्रशासकीय खून असो की जे. एन. यू. प्रकरण असो, ही सर्व याची ज्वलंत उदाहरणे आहेत. एकीकडे विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क उगळून नफेखोरी करण्याच्या खाजगी संस्थांच्या कारभारात सरकार हस्तक्षेप करीत नाही तर दुसरीकडे सरकारच्या स्वत:च्या ज्या उच्च शिक्षण सस्थांमध्ये सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेले विद्यार्थी प्रवेश घेतात, शिकण्याची संधी ज्यांना भेटते त्या स्वत:च्या संस्थांवरही हल्ले केले जात आहेत, 'लक्ष्य' केले जातेय. या सरकारी उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना चर्चेची, वादविवादाची संधी मिळते. प्रश्न उपस्थित करण्यास ते शिकतात. तरुणींना स्वत:च्या विकासाची, मन विकसित करण्याची संधी मिळते. संघ परिवाराच्या दृष्टीने हे सर्व 'शापित' आहे, तिरस्करणीय आहे म्हणूनच सरकार व मानव संसाधन मंत्रालयाने विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर अतिक्रमणे सुरू केली आहेत.

**(कृपया मागे पहा...)**

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात हेच घडले! केंद्र सरकार, गृह मंत्री यांनी थेट हस्तक्षेप केला व विद्यापीठ प्रशासनाप्रमाणेच पोलिसांनाही कारवाईचे आदेश दिले. जे. एन. यू. विद्यार्थी संसदेचा अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या कन्हैया कुमारला राष्ट्रद्रोहाच्या गंभीर आरोपाखाली तुरुंगात पाठवण्यात आलेय. त्याच्या विरोधात पुराव्याचा छोटासा धागाही सापडलेला नाही. त्याला अटक करण्यासाठी उपयोगात आणलेले व्हिडीओज, चित्रफिती बनावट असल्याचेही दाखवण्यात आले आहे. या चित्रफिती बनावट असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही विद्यापीठ प्रशासनाने पोलिसांकडे धाव घेतली आणि विद्यार्थी 'गुन्हेगार' असल्याप्रमाणे पोलिसांची शोध मोहीमही सुरू झाली. अनेक खोट्या तक्रारींमध्ये त्यांना गोवण्यात आलेय.

कोणत्याही विद्यार्थ्याला बोलावून त्यांना प्रश्न विचारण्याचा परवानाच जणू खुल्या एफ.आय.आर. मुळे पोलिसांना मिळालाय. विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य या कृतीमुळे धोक्यात आले आहे.

**वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे**

काही विद्यार्थ्यांनी जे.एन.यु.मध्ये व्यक्तिगत पातळीवर ९ फेब्रुवारी २०१६ रोजी बैठक आयोजिली होती. या बैठकीत / सभेत भारताची विभागणी करण्याच्या घोषणा देण्यात आल्या असे सरकारचे म्हणणे आहे. या कार्यक्रमास डाव्यांचा पाठिंबा असल्याचा संघ परिवाराने आरोप केला आहे. खरे तर एकही डावी विद्यार्थी संघटना या कार्यक्रमाच्या आयोजनात सहभागी नव्हती. संविधानाच्या चौकटीतच काश्मिर समस्येवर तोडगा निघू शकतो, ही डाव्यांची भूमिका सर्वश्रुत आहे. देशाची विभागणी करण्यासंबंधीच्या घोषणांचा डावे निषेध करतात, विरोध करतात. कोणी अशा घोषणा दिल्या? आतापर्यंत एकही पुरावा सरकार सादर करू शकलेले नाही, एकाही व्यक्तीला सरकार ओळखू शकलेले नाही.

संविधानाच्या १९व्या कलमा अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारांचे डावे पक्ष संरक्षण करतात. आपल्या सोईप्रमाणे निवडक भागांचा उपयोग करून सरकार याचा उपयोग करू शकत नाही. अफजल गुरूच्या फाशीबद्दल प्रश्न उपस्थित करणारे राष्ट्रदोही व म. गांधींचा खून करणाऱ्या नथुराम गोडसेंच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या जातात तेव्हा मोदी सरकार काहीच करीत नाही. नथुराम गोडसे हा आर. एस. एस. चा नायक, त्याचा पुतळा उभारण्यासाठी आर. एस. एस. पैसेही गोळा करते. नथुरामच्या घोषणांना मोदी अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणतात.

सर्वात लाजिरवाणे चित्र दिसले ते दिल्लीच्या पतियाला कोर्टाच्या परिसरात! आर. एस. एस., भाजपच्या वकिलीच्या आघाडीचे असणाऱ्या गुंड वकिलांनी पत्रकार, शिक्षक, विद्यार्थ्यांवर न्यायालय परिसरातच हल्ला चढवला! पोलीस बघ्यांची भूमिका घेत होते. दिल्ली पोलीस आयुक्त बी. एस. बस्सी यांच्या आशीर्वादाने हे घडले, त्यांनी वकिलांच्या कृतीचे समर्थन केले. मारहाण करणाऱ्या वकिलांची ओळख पटल्यावरही त्यांना अटक करण्यात बस्सींनी नकार दिली. पुन्हा २ दिवसांनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही याच वकिलांनी कोर्ट परिसरात पुन्हा गोंधळ घातला, सुनावणीसाठी कोर्टात आणल्या गेलेल्या कन्हैया कुमारला मारहाण केली. राष्ट्रध्वजही या वकिलांनी फडकावले व याचाच शस्त्र म्हणूनही वापर केला. आर. एस. एस., भाजपच्या स्पष्ट पक्षपाती असणाऱ्या बस्सींची हकालपट्टी झाली पाहिजे.

दिल्ली पोलिसांच्या या निष्क्रियतेला गृहमंत्री राजनाथ सिंग हेच थेटपणे जबाबदार आहेत. बनावट चित्रफितीच्या आधारे त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रद्रोही घोषित केले. या विद्यापीठाने अनेक शिक्षणतज्ज्ञ, अधिकारी, शास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ देशाला दिले! हे विद्यापीठ बंद करण्याचा घाट भाजपने घातला आहे.

जे. एन. यू. ला वाचवण्यासाठीचा लढा देशभर पसरला आहे. सरकारमधील घटक पक्षही या विद्यापीठाचा कारभार पूर्वपदावर येण्याची व कन्हैया कुमारच्या सुटकेची मागणी करीत आहेत. कन्हैया कुमारची तातडीने सुटका करावी, सर्व विद्यापीठांवरील राष्ट्रद्रोहाचे खटले मागे घ्यावेत, विद्यापीठ परिसरातून पोलिसांची कुमक परत बोलवावी आदी मागण्यांसाठी समजातील सर्व घटकांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन डाव्या पक्षांनी केले आहे, करीत आहे. डाव्या पक्षावर, पक्षाच्या कार्यालयावर हल्ले होत आहेत. परंतु संवैधानिक अधिकारांच्या संरक्षणासाठी चाललेल्या डाव्या पक्षांच्या लढाईला कोणीही थांबवू शकणार नाही. आम्ही आमच्या उद्दिष्टांपासून तसूभरही मागे हटणार नाहीत याची आम्ही भारतीय जनतेला हमी देत आहोत?